मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण विभाग
क.वि.क/३८/२०१३

डॉ. मृदुल निळे
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०

परिपत्रक ः
खालील नमूद नक्कल पत्र हे मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दिनांक २५.०९.२०१३ चे आहे.

---

प्रति,
जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

विषय ः मतदान प्रचार व मतदारांची नोंदणी प्रकल्प.
संदर्भ ः युवा फाऊंडेशनचे दिनांक २१ सप्टेंबर, २०१३ चे पत्र.

महोदय,

संदर्भाधिन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

युवा फाऊंडेशन ही संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत चॅरीटेबल संस्था म्हणून नोंदणीकृत आहे. या संस्थेला युवा पिढीमध्ये मतदानाच्या महतीबद्दल जागरूकता निर्माण करण्याकरिता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांना मतदान नोंदणीसाठी प्रवृत्त करण्याचे कार्य करावयाचे आहे.

युवा फाऊंडेशनच्या पत्रास अनुसरून युवक मतदारांना मतदानाच्या हक्कांची जाणीव करून देणे व त्यांनी मतदार म्हणून नोंदणी करावी यासाठी प्रचार करण्याकरिता महाविद्यालय व सार्वजनिक ठिकाणी **'MY VOTE, MY VOICE'** हा प्रकल्प हाती घेण्यासाठी युवा फाऊंडेशन या संस्थेला आवश्यक ते सहकार्य द्यावे. ही विनंती. सदरहू संस्था हे कार्य निःपक्षपातीपणे व कोणत्याही आर्थिक अपेक्षेविना करेल या अटीवर हे सहकार्य देण्यात यावे.

आपला विश्वासू,
सही/-
(शिरीष मोहोड)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

---

कार्यवाही अहवाल संचालक विद्यार्थी कल्याण विभागास, ई -मेल वर ःdeptstudentswelfare@gmail.com/ सादर करावा किंवा वरील पत्त्यावर पाठवावा.

सही/-
(डॉ.मृदुल निळे)
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

दिनांक ः २२ ऑक्टोबर,२०१३.

प्रत रवाना ः प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/ विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांच्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.